Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


## Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

February -2022

(CCCXXXVIII) 338






**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm.Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

B.Aadhar

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli Dist. Hingoli

Shivaji College Dist. Hingoli

(SJIF) Impact Factor-8.575

ISSN-2278-9308

# B.Aadhar


## Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**February -2022**

ISSUE No- (CCCXXXVIII) 338





Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor :
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

| | | |
|---|---|---|
| 21 | [illegible] तुकडोजी महाराजांची अभंगरचना — डॉ. गणेश चव्हाण | 110 |
| 22 | जागतिकीकरण व नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरी — सहा. प्रा. दीपक स. वानखडे | 115 |
| 23 | संत एकनाथांची भारूडे समाज प्रबोधनाचे माध्यम — सहा. प्राध्यापक शशिकांत वि. काळे | 120 |
| 24 | आदिवासीचं धार्मिक आणि संस्कृती जीवन — डॉ. गोविंद गायकी | 125 |
| 25 | संत कवयित्री योगिनी बहिणाबाई — डॉ.नमता दयणे | 128 |
| 26 | Environmental work pressure for Library Professionals in modern scenario — **Dr.Prashant S.Thakare** | 131 |
| 27 | Socialdiffrentiation, : A Review Of Richard Wright Works — **Dr. Suresh Devidas Bansod** | 134 |
| 28 | The Process of Entrepreneurship — **Dr. Rajesh M. Deshmukh** | 136 |
| 29 | भारतीय पर्यटन धोरण : एक आर्थिक अध्ययन — प्रा.संध्या आत्माराम इंगळे | 139 |
| 30 | भारतातील आदिवासी जमातीच्या समस्या व विकासाचे प्रयत्न — प्रा.डॉ. सुखनंदन ढाले | 141 |
| 31 | मेळघाट वन विभागातील सागवानलाकडाचे उत्पादन व विपणन — सुधीर शरदचंद्र मुळे | 145 |


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-93.. | February 2022
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, 338(CCCXXXVIII)

# भारतातील आदिवासी जमातीच्या समस्या व विकासाचे प्रयत्न

प्रा.डॉ. सुखनंदन ढाले
राज्यशास्त्र विभागप्रमुख शिवाजी महाविद्यालय, हिंगोली
Email - dhalesu@gmail.com Mob - ९८२२६९८८१८

**सारांश : (Abstract)**

आदिवासी जमात ही भारतीय समाजव्यवस्थेतील महत्वाचा घटक आहे. या जमातीची स्वतंत्र संस्कृती आहे. भारतीय लोकसंख्येच्या ८.६२ टक्के असणारी आदिवासी जमात आहे. या जमातीच्या पारंपारिक जीवनपध्दतीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या व इतर संस्कृतीच्या संपर्क व सहवासामुळे निर्माण होणाऱ्या समस्या अशाप्रकारे आदिवासींच्या समस्याचे एकूण स्वरुप आहे. या समस्यांचे स्वरुप गुंतागुंतीचे आहे. पारंपारिक जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांमध्ये नवजीवन आजार, रोगराई, अन्नाचा तुटवडा, बेरोजगारी, बेकारी, इ. समस्यांची भर पडली. परिणामी आदिवासीच्या जीवनात उदासीनता, नैराश्य निर्माण झाले आहे. सत्यप्रिय, कष्टाळू, साधाभोळा, प्रामाणिक, धर्मवेडा आदिवासी या समस्यापुढे शरणागती पत्करुन आपल्या अस्तित्वाची लढाई हरतो की काय अशी परिस्थिती निर्माण होत आहे. आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारतीय संविधानामध्ये आदिवासींच्या संरक्षणासाठी तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच शासकीय स्तरावर अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यामाध्यमातुन आदिवासींच्या विकासाचे प्रयत्न होत आहेत.

**संज्ञा (Keyword) :** आदिवासी , जमात, संस्कृती , समस्या , विकास , प्रगत समाज

**प्रस्तावना**

जगातील सर्व देशात अदिवासी जमाती अस्तीत्वात आहे. विशेषत: आशिया, अमेरिका आणि अफ्रिका या खंडातील देशात आजही अदिवासी जमाती मोठ्या प्रमाणावर आढळतात. भारतामध्ये २५० आदिवासी जमाती आहेत. अदिवासी जमाती आणि उपजातीचा विचार केल्यास ही संख्या ४५० च्या वर आहे. काळाच्या ओघात मानवी जीवनाच्या कक्षा रुंदावत गेल्या आहे. अनेक क्षेत्रात क्रांती घडुन आली. मानवी विकासाच्या या प्रक्रियेपासून व प्रवाहापासुन आदिवासी जमात दूर आहे.[1] ब्रिटीश राजवटीमध्ये भारतामधील आदिवासीच्या विकासाचे प्रयत्न झाले होते. परंतू या मागे त्यांचा विकासापेक्षा त्यांचे धर्मांतर घडवून आणणे हा हेतू होता. परंतू स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही राजवटीमध्ये समाजाचा कोणताही भाग विकासाच्या प्रक्रियेमध्ये दूर अथवा किमान विकासाच्या पातळीखाली राहता कामा नये ही अपेक्षा होती. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने लोककल्याणकारी राज्य उभे करण्यास अजूनही अपयशी ठरला आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीची स्तुती संपूर्ण जगभर चालू असतांना आपल्या देशाची सामाजिक प्रगती खुटली आहे. सामाजिक विषमता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. काही लोक प्रचंड गतीने आर्थिक विकास करत आहेत. तर काही लोक आजही उपाशी पोटी झोपत आहेत. यापैकीच विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर पडलेला एक दुर्देवी सामाजिक घटक म्हणजे आदिवासी जमात आहे. आपल्या वैशिष्ट्येपुर्ण सामाजिक जीवन पध्दतीमुळे तो नेहमीच इतर समाज घटकापासून दूर राहील्याचे दिसून येते. त्यांना वर्षानुवर्षाच्या मागासलेपणाच्या चिखलातून बाहेर काढण्यासाठी सरकारने वेळोवेळी बऱ्याच उपाययोजना केल्या आहेत. पण राजकीय व प्रशासकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे हे प्रयत्न फारच तोकडे पडल्याचे दिसून येते.[2] त्यामुळेच आजही आदिवासी समागाला विविध प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे.

**आदिवासी म्हणजे काय ?**

इंग्रजीमधील Tribe या शब्दाचा अर्थ जमात असा होतो. यासाठी मराठी मध्ये आदिवासी हा शब्द जास्त प्रचलित झालेला दिसुन येतो. भारतीय संविधानाच्या कलम ३४१ व ३४२ (१) नुसार ज्यांचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादीत केला आहे. त्यांना अनूसूचित जमाती असे म्हटले जात आहे.[3] आदिवासी किंवा आदिम समाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाला विचारवंत अभ्यासक, प्रशासक व सामाजिक कार्यकर्ते यांनी विविध नावे दिलेली आहेत.[4]

**संशोधनाची उद्दीष्ट्ये**

प्रस्तुत विषयाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे निश्चित केली आहेत.

१) आदिवासी जमातीच्या समस्याचा अभ्यास करणे.
२) आदिवासी जमातीच्या विकासाचे प्रयत्न जाणून घेणे.

**महाराष्ट्रातील आदिवासी जमातीच्या समस्या**

आदिवासी जमातीच्या पारंपारिक जीवनपध्दतीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या व संस्कृतीच्या संपर्क व सहवासामुळे निर्माण होणाऱ्या समस्या बिकट, विदारक व गुंतागुंतीचे आहे. पारंपारिक जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांमध्ये नवनवीन आजार, रोगराई, अन्नाचा तुटवडा, बेरोजगारी, बेकारी, इ. समस्याची भर पडली. परिणामी, आदिमांच्या जीवनात उदासिनता, नैराश्य निर्माण झाले.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

सत्यप्रिय, कष्टाळू, साधाभोळा, प्रामाणिक व धर्मवेडा आदिवासी या समस्यांपुढे शरणागती पत्करुन आपल्या अस्तित्वाची लढाई हारतो की काय अशी परिस्थिती निर्माण होत आहे. महाराष्ट्रातील आदिवासी जमातींच्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

**अ ) सामाजिक समस्या**

आदिम आदिवासी जमातीमध्ये बालविवाह प्रथा अस्तित्वात नव्हती. परंतू प्रगत हिंदूच्या संपर्कामुळे या प्रथेचा आदिवासी जमातीत उदय झाला. आदिवासी जमातीमध्ये वधूमुल्य संकल्पनेचा शिरकाव झाला. युवागृहे ही जमातीतील यूवक-युवतींना सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक शिक्षण व संस्कार देणारी संस्था होती. युवागृहाचे पतन होउन त्यांच्या जागी अन्य शिक्षण संस्थेचे प्रतिरोपन न झाल्याने नवीन पिढीकडे परंपरागत संस्कृतीचे हस्तांतर कठीण बनले. मद्यपान हे आदिवासी जमातीमध्ये खोलवर रुजलेले आहे. मोहाची फुले, तांदळाचे पीठ, ताड, माड, इ. पासून बनविलेल्या परंपरागत दारु किंवा ताडी माडीमध्ये मादक पदार्थांचे प्रमाण कमी असते. यावर शासकीय बंदी असल्याने त्याची जागा मद्यार्काचे जास्त प्रमाण असणाऱ्या हातभट्टी व कारखान्यातून तयार होणाऱ्या दारुने घेतली. परिणामी मद्यसेवनामुळे शरीरावर, कार्यक्षमतेवर, मानसिकतेवर व कौटूंबिक जीवनावर विपरीत परिणाम झाला.

**आ ) सांस्कृतिक समस्या**

आदिवासी जमातीची भाषा ही समाजाची सांस्कृतिक मुल्यांना प्रतिबिंबित करते. आदिवासी जमातीमध्ये धार्मिक श्रध्देला महत्व आहे. त्यांच्या वैयक्तिक व सामुदायिक अडचणीचे निवारण धर्म व जादूमुळे होत होते. शिवाय त्यांना मानसिक शांती व समाधान मिळत होते. धर्मांतर व प्रगताच्या संपर्कामुळे आदिम जीवनातील धर्म व जादू यांचा प्रभाव कमी होत आहे. त्यामुळे धर्माच्या आधारावर उभी असलेली त्यांची सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था कोलमडत आहे.

**इ ) आरोग्यविषयक समस्या**

महाराष्ट्रातील आदिवासी जमात प्रगत समाजाच्या बरोबरीने वागण्याचा प्रयत्न करतो. प्रगत समाजाप्रमाणे पोषाख वापरत आहे. परंतू पूर्ण पोषाख वापरण्याच्या सवयीचा अभाव, कपड्याची अस्वच्छता तसेच पावसाळ्यात ओले कपडे वापरणे इ. मुळे चर्मरोग व न्यूमोनियासारख्या आजारांना आदिवासी नेहमीच बळी पडतात. पोटभर व नियमित जेवणाचा अभाव, अपार कष्ट, व्यसनाधिनता, आरोग्यसंबंधी अज्ञान, आधुनिक वैद्यकीय उपचारासंबंधी नकारात्मक मानसिकता, अंधश्रध्दा, स्त्रियांचे लैंगिक शोषण इ. अनेक कारणामुळे आदिवासी समाजाच्या आरोग्यविषयक समस्या अत्यंत गंभीर आहेत.[५]

**ई ) आर्थिक समस्या**

आदिवासी जमातींना अनेक आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांच्या आर्थिक दूस्थितीतून खालील समस्या निर्माण झाल्या आहेत. भौगोलिक पृथकतेमुळे स्थानांतरीत किंवा बदलती शेती हा आदिवासींच्या परंपरगत जीवनपध्दतीचा भाग आहे. पण ही शेती अत्यंत मागासलेली असून नवीन अवजारे उत्तम बी-बीयाणे, विविध प्रकारची खते, इ. चा वापर ठाऊक नसल्याने येणारे पीक अपूरे व निकृष्ट असते. त्यामुळे त्यावर वर्षभर आली गुजराण होणे कठीण असते. त्यामुळे गरजा व खर्च भागविण्यासाठी कर्ज काढणे अपरिहार्य बनते व कर्ज बाजारीपणा ही समस्या निर्माण झाली आहे. आदिवासी हे जंगलाचे अनिभषिक्त राजे होते. संपूर्ण जंगलावर आदिवासींचा अधिकार होता. जंगलतोड करुन परंपरागत शेती केली जात असे. ब्रिटीश कालखंडात नवीन जंगलविषयक कायदे निर्माण झाले. त्यामुळे पशुची शिकार करणे, दारु गाळणे, मध गोळा करणे इ. गोष्टींवर निर्बंध आले. या जंगलविषयक कायद्याचे स्वरुप आदिवासींना प्रतिकुल असल्याने आदिमांचे आर्थिक स्वातंत्र्य संपुष्टात आले व त्यांच्या आर्थिक जीवनावर विपरीत परिणाम झाला.[६]

**आदिवासी जमातीच्या विकासाचे प्रयत्न**

आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पुढील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

**अ. घटनात्मक तरतुदी व उपाययोजना**

भारतीय संविधानामध्ये आदिवासीच्या संरक्षणासाठी पुढील तरतुदी करण्यात आल्या आहेत. कलम १५(४), कलम १६(४), कलम १७, २३(१), २३(२), कलम २५ (२), कलम २९ (१), कलम ३३० (१), कलम ३३२, कलम ३३८ नुसार अनुसुचित जमातींना संरक्षण देण्यात आले आहे.[७]

**आ) शासकीय योजना**

आदिवासी जमातीच्या विकाससंदर्भात शासकीय स्तरावर विविध उपाययोजना केल्या जातात. या माध्यमातून आदिवासी जमातीच्या विकासाचे उद्दिष्ट साध्य केल्या जाते. यानुसार आदिवासी जंगल व जमीनी सुरक्षित राहाव्यात यासाठी त्यांना अनुसरुन कायदे करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारवर टाकली आहे. याला अनुसरुन महाराष्ट्रात जमीन महसुल संहिता १९६६ मधील कलम ३६ अ नुसार आदिवासींच्या जमीनी शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय बिगर आदिवासीकडे हस्तांतरीत होत नाहीत[८] तसेच ज्या जमीनी हस्तांतरीत झाल्या असतील त्या परत मिळविण्याचा हक्क आदिवासींना प्राप्त होतो.

१) शासकीय वस्तीगृह

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Aadhar International Peer Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 338(CCCXXXVIII)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

१. आदिवासी जमातीच्या पारंपारिक जीवनपध्दतीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या व संस्कृतीच्या संपर्क व सहवासामुळे निर्माण होणाऱ्या समस्या विकट, विदारक व गुंतागुंतीचे आहे.

२. आदिम आदिवासी जमातीमध्ये प्रगत हिंदूच्या संपर्कामुळे बालविवाह प्रथा, हुंडा प्रथेचा उदय झाला.

३. धर्मांतर व प्रगत समाजाच्या संपर्कामुळे आदिम जीवनातील धर्म व जादु यांचा प्रभाव कमी झाल्यामुळे धर्माच्या आधारावर उभी असलेली आदिवासी जमातीची सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था कोलमडत आहे.

४. जंगलविषयक कायद्याचे स्वरुप आदिवासींना प्रतिकुल असल्याने आदिवासी जमातीचे आर्थिक स्वातंत्र्य संपुष्टात येऊन त्यांच्या आर्थिक जीवनावर विपरीत परिणाम झाला आहे.

५. भारतीय संविधानामध्ये आदिवासीच्या संरक्षणासाठी तरतुदी करण्यात आल्या आहेत.

६. आदिवासी जमातीच्या विकासासंदर्भात शासकीय स्तरावर विविध उपाययोजना करुन आदिवासी जमातीच्या विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

७. आदिवासी जमातीच्या विकासासाठी विविध कल्याणकारी योजना केंद्रशासन, राज्यशासन व जिल्हा शासनाच्या वतीने राबविल्या जातात.

भारतीय समाजव्यवस्थेतील एक महत्वाचा समाज घटक म्हणजे अदिवासी जमात आहे. भारतीय समाज विविध जातीमध्ये विभाजित झाला आहे. भारतामध्ये एक हजारपेक्षा जास्त जाती आणि उपजाती आहे. या जाती प्रमाणेच अदिवासी जमाती आहे. देशातील सर्वच राज्यामध्ये कमी अधिक प्रमाणात अदिवासी जमाती आढळतात.

संदर्भ सुची

१. देवगावकर, शैलजा., देवगांवकर, श.गो., (२००१), आदिवासी विश्व, नागपूर, आनंद प्रकाशन, १.
२. फडके, सुधीर., (१९६३), महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, पुणे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, ६.
३. फडके, सुधीर., (१९६३), महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, पुणे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन,७.
४. गावित, डॉ. माहेश्वरी., (२००८), महाराष्ट्रातील आदिवासी, मराठी साहित्य, पुणे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, १३.
५. माडमोंडे, डॉ. गुरुनाथ., (१९८६), भारतीय आदिवासी, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १३.
६. साळुंके, डॉ. संजय, भा., (२००९), आदिवासी समाजशास्त्र, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन, २३.
७. भारतीय संविधान,
८. साळुंके, डॉ. संजय, भा., (२००९), आदिवासी समाजशास्त्र, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन, २४.
९. जाधव, तुकाराम, (२००२), (संपादक), महाराष्ट्र वार्षिकी २०१२, पुणे, द युनिक ॲकेडमी, ३६५.
१०. जाधव, तुकाराम, (२००२), (संपादक), महाराष्ट्र वार्षिकी २०१२, पुणे, द युनिक ॲकेडमी,३६६.
११. गारे, डॉ. गोविंद, (२००२), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, ११.
१२. मांडे, प्रभाकर., (१९८३), गावगाड्याबाहेर, औरंगाबाद, परिमल प्रकाशन, ९.
१३. वार्षिक आदिवासी उपयोजना, (२००८-०९), महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, ४६२.
१४. गारे, डॉ. गोविंद., (२०००), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १७
१५. गारे, डॉ. गोविंद., (१९८६), आदिवासी विकासाचा आर्थिक कार्यक्रम, पुणे, आदिवासी विकास व प्रशिक्षण संस्था, १०.
१६. वार्षिक आदिवासी उपयोजना, (२००८-०९), महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, ४६३
१७.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli